महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ मधील परिशिष्ट ४२ खालील वित्तीय अधिकारामध्ये सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग,**

**शासन निर्णय क्र. विअसु २०१५/प्र.क्र.२१८/इमा-२**

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दि. २७ ऑगस्ट, २०१९.

**<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, विअसु २०१५/प्र.क्र.२१८/इमारती-२, दि. १६/१२/२०१५.**

**२) शासन निर्णय, क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमारती-२, दि. २७/९/२०१८.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभागाकडे सोपविलेली कामे सुलभ रितीने पार पाडण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावलीच्या परिशिष्ट-४२ मधील विविध वित्तीय अधिकारात सुधारणा करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम नियमावली परिशिष्ट-४२ मधील अनुक्रमांक २० मध्ये निविदा स्विकारण्याचा अधिकार व प्राधिकारी यांना सोपविलेल्या अधिकाराची व्याप्ती नमूद करण्यात आली आहे. तसेच दि. २७/९/२०१८ च्या शासन निर्णयानुसार निविदा स्वीकृती अधिकारात सुधारणा करण्यात आली आहे.

जलसंपदा विभागाने त्यांच्या विभागाकडील असलेले कामाचे स्वरुप, व्याप्ती विचारात घेऊन त्यांचेकडील शासन निर्णय क्र. वित्तीय ०४१८/प्र.क्र.२३२/मोप्र-१, दि. ३० ऑगस्ट, २०१८ नुसार निविदा स्वीकृतीच्या वित्तीय अधिकारांमध्ये सुधारणा केली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडील असलेली कामांची व्याप्ती व स्वरुप विचारात घेऊन तसेच शासनाकडे प्राप्त होणारे निविदा प्रस्ताव विचारात घेऊन अनुषंगिक बदल करणे क्रमप्राप्त आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील प्रकल्प विशिष्ट कालमर्यादेत पूर्ण करणे बंधनकारक असून प्रकल्पाच्या निविदा मंजुरीच्या प्रक्रियेमध्ये गती आणण्यासाठी तसेच निविदा प्रक्रीयेमधील कालापव्यय टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कार्यान्वीत करावयाच्या कामांच्या निविदा स्विकृतीबाबत वित्तीय अधिकारात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने जाणीवपूर्वक खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे-

**शासन निर्णय :-**

१. सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रु. ३० कोटी ते १०० कोटीपर्यंतच्या निविदा प्रस्तावांसाठी खालीलप्रमाणे निविदा समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, सा.बां. विभाग | :- | अध्यक्ष |
| सचिव (रस्ते) | :- | सदस्य |
| सचिव (बांधकामे) | :- | सदस्य |
| आंतरवित्त सल्लागार व सहसचिव | :- | सदस्य |
| उपसचिव (रस्ते/इमारती) (कामाच्या स्वरुपानुसार) | :- | सदस्य सचिव |

२. सार्वजनिक बांधकाम विभागातील प्रकल्पाच्या निविदा मंजुरी प्रक्रीयेमध्ये गती आणण्यासाठी प्रचलीत वित्तीय अधिकारांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| प्रचलीत अधिकाराचे स्वरुप | ज्यांच्याकडे अधिकार सोपविण्यात आला तो प्राधिकारी | प्रचलीत मर्यादा सा.बां.वि., शासन निर्णय, क्र. विअसु-२०१५/ प्र.क्र.२१८/ इमारती-२, दि. १६ डिसेंबर, २०१५ नुसार | सुधारित मर्यादा |
|---|---|---|---|
| निविदा स्विकारण्याचा अधिकार | अ.मु.स. (वित्त)<br>अ.मु.स. (नियोजन)<br>अ.मु.स. (सा.बां.वि)<br>अ.मु.स./प्र.स. (जलसंपदा)<br>यांची समिती | पूर्ण अधिकार | पूर्ण अधिकार |
| | सा.बां. विभागाकडील अ.मु.स./प्र.स. (सा.बां.वि.) यांच्या अध्यक्षतेखालील निविदा समिती | रु.३० कोटीपर्यंत (प्रचलित दरसूचीच्या किंमतीच्या ५ टक्के अधिक्यास अधीन राहून) | रु. २५० कोटीपर्यंत (प्रचलित दरसूचीच्या किंमतीच्या ५ टक्के अधिक्यास अधीन राहून) |
| | सचिव (रस्ते/बांधकामे) यांच्या अध्यक्षतेखालील निविदा समिती | रु.१५ ते ३० कोटी पर्यत (प्रचलित दरसूचीच्या किंमतीच्या ५ टक्के अधिक्यास अधीन राहून) | बदल नाही |
| | मुख्य अभियंता | प्रति प्रकरण रु. १५.०० कोटीपर्यंत (प्रचलित दरसूचीच्या किंमतीच्या ५ टक्केपेक्षा जास्त अधिक्याकरिता मर्यादा रु. २.५० कोटी) | बदल नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| | अधीक्षक अभियंता | प्रति प्रकरण रु. २.५० कोटीपर्यंत (प्रचलित दरसूचीच्या किंमतीच्या ५ टक्केपेक्षा जास्त अधिक्याकरिता मर्यादा रु. ५०.०० लक्ष) | बदल नाही |
| | कार्यकारी अभियंता | प्रति प्रकरण रु. ५०.०० लक्ष पर्यंत | बदल नाही |
| | संचालक, उपवने व उद्याने | फलोद्यान विषयक कामासाठी रु. ५,००,०००/- अभियांत्रिकी कामासाठी रु. २,००,०००/- | बदल नाही. |
| | सहाय्यक कार्यकारी अभियंता | रु. ५,००,०००/- | बदल नाही. |
| | सहाय्यक अभियंता (वर्ग-१) उप अभियंता | रु. २,००,०००/- | बदल नाही. |
| | उपविभागीय अभियंता | रु. १,५०,०००/- | बदल नाही. |
| | उप विभागीय अधिकारी | रु. १,००,०००/- | बदल नाही. |

महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील संहितेमध्ये विहित कलमे यथावकाश सुधारीत करुन प्रसिध्द करण्यात येतील. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. अन्वये निर्गमित करण्यात येत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८२७१७३०१९३३१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Chandrashekhar Prabhakar Joshi

Digitally signed by Chandrashekhar Prabhakar Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c8893d1513ab2ea4a7f8c612a31ac748bd05ab00efd5e22f2d25c9872e36d29, serialNumber=423be4ff70a89bfc945ec5e481b972d568094459d7ff8219a1f968860a431f89, cn=Chandrashekhar Prabhakar Joshi
Date: 2019.08.27 17:37:39 +05'30'

**( चंद्रशेखर जोशी )**
**सचिव (रस्ते)**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव/मा.मुख्य सचिव यांचे सहसचिव
२. मा.मंत्री (सा.बां)/मा.मंत्री (ग्रामविकास व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
३. अ.मु.स (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अ.मु.स (सा.बां)/सचिव (रस्ते)/सचिव (बांधकामे), सा.बां.विभाग, मंत्रालय
५. अ.मु.स., नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

६. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्राालय, मुंबई
७. सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
९. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१०.अधिदान व लेखाधिकारी, मुंबई /निवासी लेखा अधिकारी, मुंबई
११.सर्व मुख्य अभियंते, सा.बां.प्रा.विभाग व (विद्युत) विभाग
१२.सर्व अधीक्षक अभियंते, सा.बां.मंडळ व (विद्युत) मंडळ
१३.सर्व अधिकारी व कार्यासन अधिकारी, सा.बां.विभाग, मंत्रालय
१४.निवडनस्ती (इमारती-२ कार्यासन)